मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# चिंचवड रेल्वेस्थानकाजवळ नवा पूल मंजूर

## महापालिका आयुक्तांचा निर्णय : रेल्वेच्या पत्राची दखल, जुना पूल पाडणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

मुंबई-पुणे लोहमार्गावर पिंपरी-चिंचवड महापालिकेने पिंपरी आणि चिंचवड येथे उड्डाणपूल उभारले आहेत. त्यांचे आयुष्य संपलेले असल्याने दोन्ही पूल पाडावेत, असे पत्र रेल्वे विभागाने महापालिकेला गेल्या आठवड्यात पाठवले आहे. त्याची दखल घेऊन चिंचवड स्टेशन येथे नवीन पूल उभारण्यास आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी मंगळवारी मंजुरी दिली. पिंपरीतील पुलाचे नूतनीकरणाचे काम अंतिम टप्प्यात असून, त्याबाबत प्रशासन काय भूमिका घेते, याकडे लक्ष लागले आहे.




मुंबई-पुणे महामार्गाला समांतर लोहमार्ग आहे. तो शहराच्या मध्यातून गेला आहे. त्यामुळे शहराचे दोन भागात विभाजन झाले आहे. त्यांना जोडण्यासाठी आणि शहरातील नागरिकांच्या सोयीसाठी महापालिकेने पिंपरी येथे इंदिरा गांधी यांच्या नावाने उड्डाणपूल उभारला आहे. त्यामुळे महामार्गासह भोसरी एमआयडीसी आणि पिंपरीगाव, पिंपरी कॅम्प, चिंचवड लिंक रस्ता परिसर जोडले गेले आहेत. हा उड्डाणपूल शहरातील सर्वात जुना आहे. त्याचे आयुष्य संपले आहे. तो धोकादायक झाला असून, वाहतुकीस बंद करावा व पाडून टाकावा, असे पत्र रेल्वे विभागाने महापालिकेचे तत्कालीन आयुक्त श्रावण हर्डीकर यांना पाठविले होते.

त्यानंतर महापालिकेने पुलाचे स्ट्रक्चर ऑडिट केले आणि त्याच्या मजबुतीकरणाचे काम हाती घेतले आहे. गेल्या दोन वर्षांपासून काम सुरू असून ते आता अंतिम टप्प्यात आहे. आता चिंचवड स्टेशन येथील लोहमार्गावरील उड्डाणपुलाच्या बांधकामास ४७ वर्षे झाली आहेत. ते बांधकाम धोकादायक झाले असून, तो पूल पाडा, असे पत्रही रेल्वेने महापालिकेस पाठविले आहे. या पुलाशेजारी महापालिकेने सुमारे १५ वर्षांपूर्वी समांतर पूल बांधला आहे. या पुलाच्या एका भागातून अवजड वाहतूक गेल्या वर्षापासून बंद आहे.

### स्थायी समितीची मंजुरी

» चिंचवड येथे मुंबई-पुणे महामार्ग ते प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहाच्या दिशेने जाणाऱ्या मार्गादरम्यान असलेल्या लोहमार्गावर नवीन पूल उभारण्यास आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी मंगळवारी स्थायी व सर्वसाधारण सभेत मंजुरी दिली. चिंचवड स्टेशन मुंबई-पुणे महामार्ग ते चिंचवडगाव मार्गावर लोहमार्गावर दोन समांतर पूल अस्तित्वात आहेत. चिंचवड स्टेशनकडून गावाकडे जाणाऱ्या पुलाचे आयुर्मान संपले आहे. त्यामुळे तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका अधिकाऱ्यांनी पुलाची पाहणी केली. त्यांच्या सूचनेनुसार जुन्या पुलावर अवजड वाहनास प्रवेश बंदी केली आहे. पीएमपी बससुद्धा खंडोबा माळ आकुर्डी मार्गे वळविण्यात आल्या आहेत. सुरक्षेच्या दृष्टीने जुना पूल पाडून नवीन पूल उभारण्याच्या विषयास आयुक्त शेखर सिंह यांनी मान्यता दिली.

# महिलेची रस्त्यातच प्रसूती, महिला पोलिस बनल्या दाई

## महिला पोलिसांनी दाखवलेल्या तत्परतेचे सर्वत्र कौतुक : बाळ आणि बाळाची आई सुखरूप

**पिंपरी | प्रतिनिधी**

दोन महिला पोलिस कर्मचारी कर्तव्यावर असताना, रस्त्यावरील एक गरोदर महिलेला बाळंतपणाच्या कळा सुरू झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. तिची अवस्था लक्षात घेता, या महिला पोलिसांनी तिला तत्काळ आडोशाला नेले. डॉक्टर आणि रुग्णवाहिकेशी संपर्क साधला. रुग्णवाहिका येईपर्यंत या महिलेने एका गोंडस बाळाला जन्म दिला. त्या वेळी महिला पोलिसांनी दाईचे कर्तव्य निभावले. ही घटना रविवारी (दि.१) दुपारी चार वाजताच्या सुमारास घडली. राजश्री माधव वाघमारे (वय २५) असे प्रसूती झालेल्या महिलेचे नाव आहे. बाळ आणि बाळाची आई सुखरुप आहेत.

वाहतूक विभागाचे पोलिस उपायुक्त बापू बांगर यांनी दिलेल्या माहितीनुसार, हिंजवडी वाहतूक विभागातील पोलिस हवालदार नीलम विजय चव्हाण व पोलिस अंमलदार रेश्मा नजीर शेख या दोघीही वाकड नाका येथे रविवारी कर्तव्यावर होत्या. दुपारी चारच्या सुमारास,



त्यांना एक गरोदर महिला वेदनेने ओरडत असल्याचे दिसून आले. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत, क्षणाचाही विलंब न करता नीलम आणि रेश्मा यांनी महिलेला आडोशाला नेले. तेथून १०८ नंबरवरील रुग्णवाहिकेशी संपर्क केला. मात्र, रुग्णवाहिका येण्यास २० मिनिटांचा कालावधी लागला. तोपर्यंत राजश्री वाघमारे यांनी एका मुलाला जन्म दिला. त्यानंतर रुग्णवाहिका आली. रुग्णवाहिकेतील डॉक्टरने बाळ आणि बाळंतीण यांची तपासणी केली. ते दोघेही सुखरूप असल्याने पुढील उपचारासाठी त्यांना औंध रुग्णालयात नेले. महिला पोलिसांनी दाखवलेल्या तत्परतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### पोलिस आयुक्तांकडून कौतुक..

» महिला पोलिस हवालदार नीलम विजय चव्हाण आणि अंमलदार रेश्मा नजीर शेख यांनी केलेल्या या कामगिरीबाबत पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे, सहआयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर आयुक्त वसंत परदेशी, उपायुक्त बापू बांगर यांनी त्यांचे कौतुक केले. या वेळी वरिष्ठ पोलिस निरीक्षक प्रसाद गोकुळे देखील उपस्थित होते.

# डेंग्यू, हिवतापासाठी 59 रुपयांत विमा!

## देशातील सर्वांत मोठ्या वित्ततंत्रज्ञान कंपनीची योजना : कीटकजन्य आणि वायूप्रदूषणाशी निगडित

**पुणे | प्रतिनिधी**

डेंग्यू, मलेरियासारखा आजार झाला तर हॉस्पिटलचं बिल पाहून पायाखालची वाळू सरकल्याशिवाय राहात नाही. त्यात महागडे इन्श्योरन्स प्लान घेणं प्रत्येकालाच परवडत असं नाही. त्यामुळे अनेक जण हेल्थ इन्श्योरन्स काढत नाहीत. कारण त्याचा हप्ताच परवडत नाही. मग डेंग्यू, मलेरियासारखा आजार झाला की हॉस्पिटलची पायरी चढतानाच थरथर होते. पण आता चिंता करण्याचं कारण नाही. कारण फक्त 59 रुपयात डेंग्यु, मलेरियासारखे आजा कव्हर होणार आहेत. डिजिटल पेमेंट प्लॅटफॉर्म PHONEPE ने एक खास प्लान लाँच केला आहे. या प्लान अंतर्गत फक्त 59 रुपयात वर्षभराचं कव्हर मिळणार आहे. यात 1 लाखापर्यंत हॉस्पिटलचा खर्च मिळणार आहे. या प्लान अंतर्गत डेंग्यू,



मलेरिया, चिकनगुनिया आणि स्वाइन फ्लूसही 10 पेक्षा अधिक आजारांवर उपचार घेता येणार आहेत. या योजनेत मलेरिया, डेंग्यू, चिकनगुनिया, फायलेरियासिस, जपानी एन्सेफलायटीस, स्वाइन फ्लू, बर्ड फ्लू, टायफॉइड, क्षयरोग आणि मेंदुज्वर यासह 10 हून अधिक आजारांचा समावेश आहे. यात रुग्णालयात दाखल करण्यापासून डायग्नोस्टिक्स आणि आयसीयूचा खर्चही मिळणार आहे. इतकंच काय तर हा प्लान मोसमी नसून वर्षभरासाठी आहे.

PHONEPEने ही योजना देशातील टियर-2 आणि टियर-3 शहरात राहणाऱ्या लोकांसाठी डिझाईन केला आहे. जेथे परवडणाऱ्या आरोग्य विम्याचे प्लान मर्यादित आहेत. कॉर्पोरेट आरोग्य विम्याचे अतिरिक्त कव्हर म्हणून देखील ही योजना कार्यरत व्यावसायिकांसाठी फायदेशीर आहे. फोनपे इन्श्योरन्स ब्रोकिंग सर्व्हिसेजचे सीईओ विशाल गुप्ता यांनी सांगितलं की, या प्लानच्या माध्यमातून विमा परवडणारा आणि सुलभ बनवला आहे. सेवा नसलेल्या भागात आरोग्य सुविधा पोहोचवण्याच्या दृष्टीने हे एक मोठं पाऊल आहे.

फोनपेच्या माध्यमातून हा हेल्थ प्लान आरामात घेऊ शकता. युजर्सला एपमध्ये इन्शोरन्स सेक्शनमधये जाऊन DENGUE AND MALARIA INSURANCE पर्याय निवडावा लागेल. यात प्लानबाबतच्या सर्व डिटेल्स दिसतील. हा परवडणारा प्लान असून सोयीस्कर आहे. इतकंच काय तर या प्लानच्या माध्यमातून क्लेमही झटपट सेटल होणार आहे. त्यामुळे हा प्लान येताच सोशल मीडियावर चर्चांना उधाण आलं आहे. भविष्यात असे अनेक प्लान येण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

### फोनपेचं म्हणणं काय?

» या योजनेबद्दल माहिती देताना, फोनपे इन्शुरन्स ब्रोकिंग सर्व्हिसेसचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल गुप्ता म्हणाले की, फोनपेद्वारे, आम्ही सर्वांना सुलभ आणि परवडणारी विमा सेवा देण्यासाठी कटिबद्ध आहोत. या योजनेतून आमच्या ग्राहकांना वर्षभर सर्वसमावेशक संरक्षण प्रदान करण्याच्या आमचा उद्देश आहे. याद्वारे, दर्जेदार सेवेतील आर्थिक अडथळे दूर करून आरोग्यविषयक धोके प्रभावीपणे व्यवस्थापित करण्यासाठी आमच्या ग्राहकांना सक्षम करण्याचे आमचे ध्येय आहे. डिजिटल वितरणातील आमच्या कौशल्याचा फायदा घेऊन, देशभरातील वंचित लोकांना अनुरूप विमा उपाय प्रदान करणे हे आमचे ध्येय आहे.

# सहयोगनगर-तळवडेत वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी उभारणार मोनोपोल!

## महानगरपालिका स्थायी समितीची मंजुरी : आमदार लांडगे, माजी नगरसेवक भालेकर यांचा पाठपुरावा

**पिंपरी | प्रतिनिधी**

तळवडेतील सहयोगनगर येथील वाहतुकीच्या रस्त्यामध्ये 40 वर्षांपासून असलेला टॉवर अखेर हटविण्यात येणार आहे. त्याजागी मोनोपोल उभारण्यात येणार आहे. त्यासाठी पात्र निविदेला महानगरपालिका स्थायी समिती सभेत मंजुरी देण्यात आली.

मोनोपोल कमी जागेत उभारल्याने सहयोगनगर ते त्रिवेणीनगर दरम्यान होणारी वाहतूक कोंडी सुटणार आहे. परिसरातील नागरिकांना दिलासा मिळणार आहे. यासाठी भोसरीचे आमदार महेश लांडगे यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश मिळाले आहे.

महापालिकेच्या 'फ' क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत तळवडे प्रभाग क्रमांक 12 मधील सहयोगनगर येथे वाहतुकीच्या रस्त्यामध्ये



महापारेषणाचा अतिउच्च दाबाचा (220 KV EHV LINE) टॉवर सुमारे 40 वर्षांपासून कार्यरत आहे. तळवडे ही औद्योगिक वसाहत तसेच आयटी पार्क असल्यामुळे लोकवस्ती व वाहतूक कोंडी येथे मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. टॉवरवरील वीजवाहिनी ही 220 केव्ही एचव्ही या क्षमतेची आहे. या मनो-याच्या खालून धोकादायक पद्धतीने वाहतूक सुरु आहे.

दरम्यान, महापारेषण कंपनीने हा रस्ता बंद करण्याबाबत वारंवार कळविले. परंतु, हा रस्ता वाहतुकीचा असून तांत्रिक कारणांमुळे बंद करणे शक्य नसल्याचे स्थापत्य विभागाने कळविले आहे. हा मनोरा स्थलांतर करुन रस्त्याच्या दोन्ही कडेला वाहतूक सुरळीत करण्याकरिता सद्यस्थितीत असलेला मनोरा (9.5 – 9.5 ) 50 मीटर पुढे किंवा मागे मोनोपोलद्वारे (3-3 मीटर) करावा. त्याप्रमाणे आवश्यक असलेला मनोरा क्रमांक 33 ही स्थलांतरित करण्याची आवश्यकता आहे. ज्यामुळे रस्त्याच्या दोन्ही बाजूस (3-3 मीटर) वाहतुकीस जागा उपलब्ध करण्याचा पर्याय समोर आला होता.

माजी नगरसेवक शांताराम भालेकर यांनी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे नवीन मोनोपोल उभारणीची मागणी होती. तसेच, भोसरीचे आमदार महेश लांडगे यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला. आमदार लांडगे यांनी प्रशासनाला कार्यवाही करण्याची सूचना केली होती. त्यानंतर प्रशासनाने कार्यवाही केली आणि या विषयाला मंजुरी दिली आहे. टॉवर काढण्यात येणार आहे. त्याजागी मोनोपोलची कमी जागेत उभारणी केली जाणार आहे. स्थायी समितीच्या बैठकीत या निविदेला मंजुरी देण्यात आली. लवकरच प्रत्यक्षात कामाला सुरुवात होईल.

> तळवडे- रुपीनगर भागातील लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. टॉवरमुळे सहयोगनगर ते त्रिवेणीनगर दरम्यान मोठी वाहतूक कोंडी होत होती. टॉवर खालून नागरिकांना ये-जा करावी लागत होती. त्यामुळे अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे टॉवर काढण्यासाठी आम्ही आग्रही मागणी केली. त्याला आमदार महेश लांडगे यांचे पाठबळ मिळाले. आता टॉवर काढून मोनोपोलची कमी जागेत उभारणी केली जाणार आहे. त्यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळेल.
>
> **– शांताराम भालेकर, माजी नगरसेवक.**

# शहरातील उड्डाणपूल बनले धोकादायक!

## रेल्वे मार्गावरील पिंपरी, चिंचवड स्टेशनचे कालबाह्य उड्डाणपूल पाडण्यासाठी रेल्वेकडून पत्र

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी गावाला जोडणारा इंदिरा गांधी उड्डाण पूल आणि चिंचवड स्टेशन या रेल्वे मार्गावरील उड्डाण पूल हे कालबाह्य झाले आहेत. महापालिकेने या दोन्ही उड्डाणपुलांची तात्पुरती दुरुस्तीदेखील केली होती. तरीही हे दोन्ही उड्डाणपूल धोकादायक बनले असून त्या पुलांचे आयुष्य संपले आहे. गंभीर अपघात होण्याची वाट बघण्यापूर्वी हे दोन्ही उड्डाणपूल पाडण्यात यावे, अशी मागणी जागरूक पिंपरी-चिंचवडवासियांकडून करण्यात येत आहे.

हे दोन्ही उड्डाण पूल तत्काळ पाडण्यात यावे, जेणेकरून भविष्यातील अपघात टाळण्यात येईल, असे पत्र रेल्वे विभागाकडून पिंपरी-चिंचवड महापालिकेला देण्यात आले आहे. रेल्वे विभागाने पाठवलेल्या पत्रावर महापालिका आता कोणती भूमिका घेणार, याकडे लक्ष लागून आहे.



पिंपरी-चिंचवड शहरातील पिंपरीगाव, मार्केट येथील इंदिरा गांधी उड्डाण पूल खूप जीर्ण झाला आहे. तसेच, चिंचवड स्टेशन येथील पुणे-मुंबई जुना महामार्ग आणि चिंचवड गावाला जोडणारा उड्डाणपूलदेखील कालबाह्य झाला आहे. हे दोन्ही उड्डाणपूल पाडण्यात यावे, यासाठी नागरिकांकडून अनेकदा पाठपुरावा करण्यात आला. रेल्वे मार्गावरील दोन्ही उड्डाणपूल तत्काळ पाडण्यात यावे, याकरिता रेल्वे विभागाकडून पिंपरी-चिंचवड महापालिकेला पत्र देऊन पाठपुरावा सुरू आहे. परंतु, हे उड्डाणपूल पाडल्यास पिंपरी आणि चिंचवड गावाकडे जाणारी वाहतूक कोणत्या मार्गाने सोडायची, असा प्रश्न महापालिकेच्या अधिकाऱ्यांना पडला आहे.

पुणे-मुंबई जुना महामार्ग आणि पिंपरी गावास जोडणारा पुणे-लोणावळा लोहमार्गावरील पिंपरी येथील इंदिरा गांधी उड्डाण पूल हा शहरातील सर्वांत पहिला पूल आहे. "या उड्डाणपुलाचे आयुष्य संपले आहे. सगळे बांधकाम धोकादायक झाले आहे. तो पूल वाहतुकीस बंद करा. पूल पाडून टाका," असे पत्र रेल्वे विभागाने महापालिकेस तत्कालीन आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या कार्यकाळात पाठविले होते. शहरातील दोन भागांना जोडणारा हा महत्त्वाचा पुल असल्याने महापालिकेने पुलाचे स्ट्रॅक्चरल ऑडिट केले. त्यानंतर त्यांचे मजबुतीकरण करण्यात आले. हे काम सुमारे दोन ते तीन वर्षे सुरू होते. त्यावर उड्डाणपूल दुरुस्तीसाठी कोट्यवधी रुपये खर्च करण्यात आला. त्यानंतर पिंपरीच्या उड्डाणपुलाचे मजबुतीकरण करण्यात आले आहे.

शहरातील चिंचवड स्टेशन येथील लोहमार्गावरील उड्डाणपुलाच्या बांधकामास ४७ वर्षे झाली आहेत. हेही बांधकाम धोकादायक झाले असून, तो पूल पाडा, असे पत्र रेल्वेने महापालिकेस नुकतेच पाठविले आहे.

### दोन्ही उड्डाणपूल पाडल्यास वाहतूक कोंडी होणार

» पिंपरीगाव आणि चिंचवडगाव या दोन्ही उपनगराला जोडणाऱ्या रेल्वे मार्गावरील उड्डाण पूल हे धोकादायक बनले आहेत. यातील पिंपरीच्या इंदिरा गांधी उड्डाणपुलावर कोट्यवधी रुपये खर्च करून देखभाल दुरुस्ती करण्यात आली. त्यामुळे हा पूल आणखी पाच वर्ष सुरू राहिल्यास काहीच अडचण राहणार नाही. चिंचवड स्टेशन येथील उड्डाण पूलदेखील कालबाह्य झालेला आहे. या पुलावर अवजड वाहतूक बंद केलेली आहे. त्यामुळे दोन्ही पुलांसाठी पर्यायी व्यवस्था उभी करण्यासाठी महापालिकेचे प्रयत्न सुरू आहेत. त्याकरिता पिंपरीत डेअरी फार्म येथील पुलाचे युद्धपातळीवर सुरू आहे. मात्र, चिंचवड स्टेशन येथून अद्याप कोणतीही पर्यायी यंत्रणा नाही. त्यामुळे दोन्ही उड्डाण पूल लगेच पाडल्यास प्रचंड वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे. नागरिकांना वळसा घालून पिंपरी, चिंचवडला जावे लागणार आहे.

# इंद्रायणी नदीसुधार योजनेचे भिजत घोंगडे

## राष्ट्रीय नदी संरक्षण संचालनालयाकडून अद्याप हिरवा सिग्नल नाही

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) नियोजित असलेल्या इंद्रायणी नदीसुधार योजनेला राज्य सरकारच्या पर्यावरण विभागाची एनओसी मिळाली आहे. मात्र, केंद्राच्या जलशक्ती मंत्रालयातंर्गत कार्यरत राष्ट्रीय नदी संरक्षण संचालनालयाकडून अद्याप हिरवा सिग्नल मिळालेला नाही. त्यामुळे इंद्रायणी नदीसुधार योजनेचे सध्या भिजत घोंगडे आहे.

इंद्रायणी नदी ही सध्या कमालीची प्रदूषित झाली आहे. इंद्रायणीमध्ये घरगुती आणि औद्योगिक सांडपाणी सोडल्यामुळे नदी प्रदूषित झाली आहे. नदी प्रदूषणासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचा भाग म्हणून इंद्रायणी नदीसुधार योजनेचे काम हाती घेण्यात आले आहे.



पीएमआरडीएने या प्रकल्पाचा 577 कोटी 16 लाख रुपये रकमेचा अंतिम सविस्तर प्रकल्प राज्य शासनास सादर केला होता. हा प्रस्ताव राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाने स्विकारुन केंद्र शासनाच्या मंजुरीसाठी पाठविला आहे.

### प्रकल्पात नेमके काय?

» इंद्रायणी नदीच्या तीरावरील एकूण 54 गावे व शहरे येथून निघून इंद्रायणीत मिसळणाऱ्या सांडपाण्यावर या प्रकल्पात प्रक्रिया केली जाणार आहे. यामध्ये प्रामुख्याने लोणावळा, तळेगाव दाभाडे व आळंदी या तीन नगरपरिषदा, वडगाव व देहू या दोन नगरपंचायती, देहू कॅन्टोन्मेंट बोर्ड, 15 हजारापेक्षा जास्त लोकसंख्येच्या 3 ग्रामपंचायती व इतर 46 ग्रामपंचायती यांचा समावेश आहे. या प्रकल्पात नदीचे पात्र स्वच्छ करणे व शुद्धीकरणाच्या उपाययोजनांवर भर दिला जाणार आहे. त्याशिवाय, मुख्य ठिकाणी नदीकाठ विकसित केला जाणार आहे. नदीमध्ये जलवाहतूक प्रणाली पुरविणे शक्य आहे का, याची व्यवहार्यता तपासली जाणार आहे. त्यानंतर जलवाहतूकदेखील प्रस्तावित आहे.

"इंद्रायणी नदीसुधार योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल राष्ट्रीय नदी संरक्षण संचालनालयाकडे मंजुरीसाठी पाठविलेला आहे. मात्र, अद्याप त्याला मंजुरी मिळालेली नाही. त्यामुळे प्रकल्पासाठी आवश्यक निविदा कार्यवाही अन्य कामकाज प्रत्यक्ष सुरू होऊ शकलेले नाही.

- अनिता कुलकर्णी, कार्यकारी अभियंता, पीएमआरडीए.

# केंद्र सरकारची योजना महापालिकेच्या बोकांडी

## खर्चाचे प्रमाण वाढल्याने आरोग्य विभाग बेजार : वाढीव खर्चासाठी निधीचा प्रस्ताव आयुक्तांपुढे ठेवणार

**पुणे | प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना आणि राज्य सरकारच्या महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनांतर्गत एकत्रित सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया मोफत केल्या जातात. या योजनेत शस्त्रक्रियेसाठी केंद्रासह राज्य सरकारने दर म्हणजेच खर्च ठरवून दिला आहे. प्रत्यक्षात मात्र शस्त्रक्रियेसाठी लागणारा खर्च जास्त येत आहे. त्यामुळे वाढीव खर्च रुग्णाकडून वसूल करणे कठीण आहे. पुणे महापालिकेतर्फे या योजनेनुसार सर्व शस्त्रक्रिया कमला नेहरू रुग्णालयात केल्या जातात. रुग्णालयात दाखल केल्यानंतर उपचार मोफत असल्याने वाढीव झालेला खर्च रुग्णांकडून दिला जात नाही. परिणामी हा खर्च महापालिकेनेच उचलावा आणि रुग्णांना चांगले उपचार मिळावे, यासाठी निधी उपलब्ध करून देण्याकरिता आरोग्य विभागाकडून महापालिका आयुक्तांकडे वाढीव खर्चाला मंजुरी देण्याबाबतचा प्रस्ताव ठेवला जाणार आहे.




केंद्र सरकारने सुरू केलेल्या योजनेत राज्य सरकारनेदेखील महात्मा ज्योतिराव फुले आरोग्य योजना आणली. या योजनेनुसार ठरवून दिलेल्या शस्त्रक्रिया मोफत केल्या जातात. केंद्राची आणि राज्याची योजना मिळून एकच योजना असल्याबाबतचा शासन आदेश नुकताच काढण्यात आला आहे.

त्यामुळे यापूर्वी प्रतिकुटुंबासाठी असलेली दीड लाख रुपयांच्या मर्यादित वाढ करून प्रतिवर्ष प्रतिकुटुंब पाच लाख रुपयांपर्यंतचे मोफत उपचार महाराष्ट्र आणि देशातील इतर राज्यांमध्ये योजनेशी संलग्नित सरकारी किंवा खासगी रुग्णालयात केले जाणार आहेत. त्यामुळे राज्यातील त्या त्या शहराच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रुग्णालयात तसेच राज्य शासनाच्या रुग्णालयात या योजनेअंतर्गत शस्त्रक्रिया केल्या जातात.

पुणे महापालिकेच्या कमला नेहरू रुग्णालयात या योजनेनुसार दिवसाला साधारणपणे ५ ते ७ सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया केल्या जातात. ही शस्त्रक्रिया करताना काही वेळा रुग्णाला अतिदक्षता विभागात (आयसीयू) दाखल करावे लागते. कमला नेहरू रुग्णालयातील आयसीयू हे खासगी असल्याने त्यासाठी पैसे मोजावे लागतात. परंतु ही योजना मोफत असल्याने झालेला खर्च भरण्याची रुग्णाच्या नातेवाईकांची बरेचदा मानसिकता नसते. त्यामुळे हा खर्च महापालिकेला करावा लागत आहे. तसेच शस्त्रक्रियेनंतर लागणारा औषधोपचार महापालिकेला पुरविण्यासाठी आरोग्य विभागाची दमछाक होताना दिसून येत आहे. त्यामुळे केंद्राची आणि राज्याची ही योजना महापालिकेच्या बोकांडी बसल्याचे दिसून येत आहे.

### इम्प्लान्टची निविदा संपल्याने रखडल्या शस्त्रक्रिया

**» दरम्यान, या योजनेंतर्गत लागणाऱ्या इम्प्लान्टची महापालिकेने काढलेली निविदा जूनमध्येच संपली आहे. त्यामुळे शेकडो शस्त्रक्रिया रखडल्या असून, त्यामुळे रुग्णांना ससून रुग्णालयात पाठवले जात आहे. निविदा नसल्यामुळे ठेकेदाराकडून पुरवठा होत नाही. त्यामुळे रुग्णांना त्रास सहन करावा लागत आहे. ससून रुग्णालयात रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने मोफत उपचारासाठी रुग्णांना रांगेत थांबण्याची वेळ आली आहे. त्यामुळे महापालिकेकडून ही निविदा संपण्यापूर्वीच नवीन प्रसिद्ध करून तिला मान्यता देणे अपेक्षित होते. त्यामुळे आरोग्य विभागाच्या कारभारावरदेखील रुग्णांच्या नातेवाईकांकडून संताप व्यक्त केला जाऊ लागला आहे.**

“ केंद्राच्या शासन आदेशानुसार आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य या योजना एकत्रित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार काही बदल होणार होते. तसेच विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता असल्याने निविदा काढण्यास वेळ लागला आहे. कमला नेहरू रुग्णालयात सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया केल्या जातात. प्रत्यारोपण शस्त्रक्रियांमध्ये लागणाऱ्या इंप्लांटचे निविदा संपली होती. आता नव्याने निविदा लावण्यात आल्या आहेत. त्यामुळे लवकर सेवा देणे सुरू होईल. रुग्णांची गैरसोय होणार नाही, याची काळजी घेतली जात आहे. शस्त्रक्रियेदरम्यान वाढीव होणारा खर्च महापालिकेच्या निधीतून करावा का यावर विचार सुरू असून तशी वाढीव खर्चाची तरतूद करण्यात यावी.

**- डॉ. नीना बोराडे, आरोग्यप्रमुख, पुणे महापालिका.**

# चंपाषष्ठी उत्सवाला जेजुरी गडावर प्रारंभ

## शंकराचार्य नृसिंह भारतींच्या हस्ते खंडोबा व म्हाळसादेवीच्या उत्सव मूर्तींची घटस्थापना

**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे कुलदैवत व बहुजन समाजाचा लोकदेव असणाऱ्या जेजुरीच्या श्री खंडोबा देवाच्या चंपाषष्ठी उत्सवाला जेजुरी गडावर प्रारंभ झाला असून, करवीर पीठाचे शंकराचार्य श्री नृसिंह भारती यांच्या हस्ते श्री खंडोबा व म्हाळसादेवीच्या उत्सव मूर्तींची घटस्थापना करण्यात आली.



सोमवारी (दि. 2) श्री खंडोबा मंदिरात देवाची पूजा अभिषेक झाल्यानंतर उत्सवमूर्तींची वाजतगाजत मिरवणूक काढून मूर्ती रंगमहालात आणण्यात आली. करवीर पीठाचे शंकराचार्य श्री नृसिंह भारती, देवसंस्थानचे विश्वस्त, पुजारी, सेवकवर्ग व ग्रामस्थांच्या वतीने पूजा करून घटस्थापना करण्यात आली. या उत्सवानिमित्त गडावर धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. घटस्थापनेनिमित्त हजारो भाविकांनी श्री खंडोबा देवाच्या दर्शनासाठी गर्दी केली होती.

श्री मार्तंड देवसंस्थानचे प्रमुख विश्वस्त अभिजित देवकाते, विश्वस्त ॲड. पांडुरंग थोरवे, मंगेश घोणे, पोपटराव खोमणे, डॉ. राजेंद्र खेडेकर, विश्वास पानसे, माजी विश्वस्त डॉ. प्रसाद खंडागळे, सुधीर गोडसे, नितीन राऊत, जय मल्हार चंपाषष्ठी अन्नछत्र प्रतिष्ठानचे गणेश आगलावे, तसेच गुरव, घडशी, कोळी, वीर सामाजाचे पुजारी, सेवकवर्ग उपस्थित होते. या उत्सवाचे पौरोहित्य वेदमूर्ती शशिकांत सेवेकरी यांनी केले.

### चंपाषष्ठीबाबत असलेले महात्म्य

**» महाराष्ट्राचे कुलदैवत खंडोबा देवाच्या वर्षाकाठी आठ यात्रा भरतात. दरवर्षी 50 लाखांहून अधिक भाविक येथे देवदर्शनासाठी येतात. खंडोबा देवाच्या चंपाषष्ठी उत्सवाला धार्मिक महत्त्व आहे. पौराणिक काळात मनी आणि मल्ल दैत्यांचा संहार करण्यासाठी श्रीमहादेवाने खंडोबाचा अवतार घेऊन दैत्यांशी युद्ध केले. सहा दिवस युद्ध करून दैत्यांचा पराभव करून विजय मिळविला. या विजयाचे प्रतीक म्हणून पौराणिक काळापासून जेजुरी गडावर चंपाषष्ठी उत्सव साजरा केला जातो.**